।। सिध्दिरनेकान्तात्।।
Estd-June 1961

**Anekant Education Society**
**Tuljaram Chaturchand College Campus**
**BARAMATI - 413 102 (Pune, India)**
Society Reg. No. Bom./385 Poona Dt. 18-9-61
Public Trust Reg. No. F. 242 Dt. 27-4-62
E-mail - secretary.anekant@gmail.com

**President**
**Shri. Arahatdas Hirachand Shah**
Phone: 02112 - (R) 224831, (O) 221205 Mob. 9921861625
**Secretary**
**Shri. Jawahar Motilal Shah**
Phone: 02112 - (R) 224666, (O) 221205 Mob. 9423004399

Ref. No. AES - 328
Date : 12 JAN 2021

# नियोजित सर्वसाधारण सभेबाबत

प्रति,

**मा.सभासद,**
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,
बारामती, जि.पुणे

यांसी.....

**महोदय,**

संस्थेची सर्वसाधारण सभा दिनांक २४/०१/२०२१ रोजी बारामती येथे संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सभेची सुचना दिनांक ०१ जानेवारी २०२१ रोजी मा.सचिव यांचे सहीने काढण्यात आली. नियोजित सर्वसाधारण सभेची सुचना व सन २०२१ ते२०२६ करीता निवड करावयाचे नियामक मंडळाचे निवडणुकीबाबत जाहीर करण्यात आलेला निवडणुक कार्यक्रम रजिस्टर्ड टपालाने सभासदांना पाठविण्यात आला होता.

मात्र दिनांक २४/०१/२०२१ रोजीचे नियोजित सर्वसाधारण सभेची सुचना व जाहीर निवडणुक कार्यक्रमाची सुचना सभासदांना प्राप्त होताच जयसिंगपुर येथील बहुसंख्य सभासदांनी दिनांक ०८/०१/२०२१ रोजी संस्थेचे मा.सचिव यांना कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता तसेच जयसिंगपुर विभागाकडील बहुसंख्य सभासद हे ६० वर्षे वयाच्या वरील असुन त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन सद्यस्थितीत प्रवास करणे व सर्वसाधारण सभेच्या गर्दीत सामिल होणे व सोशल डिस्टंसिंग पाळणे शक्य होणार नाही व हे सभासदांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोक्याचे असल्याबाबत लेखी कळवुन भविष्यात योग्य ती वेळ ठरवुन संस्थेची सर्वसाधारण सभा घेणेचे करावे असे सुचीत केले आहे.

...२...

तसेच बारामती येथील काही सभासदांनी मा.अध्यक्ष यांना समक्ष भेटुन व काही सभासदांनी दिनांक ०९/०१/२०२१ रोजी मा.अध्यक्ष व सचिव यांना लेखी पत्राने नियोजित सर्वसाधारण सभा कोरोनाची परिस्थिती लक्षात घेवुन पुढे घेण्यात यावी असे कळविले आहे.

संस्थेच्या बहुसंख्य सभासदांची तोंडी व लेखी मागणीचा विचार करता सद्यस्थितीत कोरोनाचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. गर्व्हर्निंग कौन्सिलच्या दिनांक ०६ डिसेंबर २०२१ रोजीचे सभेनंतर दुसऱ्याच दिवशी मा. सचिव यांना पुणे येथे ॲडमिट व्हावे लागले. तसेच गर्व्हर्निंग कौन्सीलचे काही सभासदांना देखील कोरोनाची लक्षणे आढळुन आल्याने क्वारंटाईन व्हावे लागले आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव, जेष्ठ सभासदांचे वय व त्यांना घराबाहेर पडणेबाबत शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश विचारात घेता सभासदांची मागणी सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य व रास्त आहे. संस्थेचे हित व सभासदांची सुरक्षितता ही आपली जबाबदारी आहे. या अनुषंगाने नियोजित दिनांक २४/०१/२०२१ रोजीची सर्वसाधारण सभा पुढे घेणे उचित होणार आहे.

या बाबत चर्चा विनिमय होवुन सभा पुढे घेणे बाबत निश्चीत करण्यात आले आहे. तसेच मा. निवडणुक अधिकारी श्री. एस. जे. साठे यांना निवडणुक पुढे घेण्यात यावी या बाबत लेखी विनंती करण्यात आली. मा. निवडणुक अधिकारी यांनी संस्था सभासदांचे सुरक्षिततेच्या कारणास्तव संस्थेने केलेल्या मागणीचा विचार करून निवडणुक पुढे घेण्यात येईल असे कळवुन नियोजित निवडणुक कार्यक्रम **पुढे ढकलण्यात** आला असल्याचे लेखी कळविले आहे.

**तरी आपणांस या सुचना पत्रकाद्वारे कळविण्यात येते की,**

संस्थेचे विद्यमान गर्व्हर्निंग कौन्सिलने दिनांक २४/०१/२०२१ रोजी नियोजित केलेली सर्वसाधारण सभा **पुढे ढकलण्यात** आलेली आहे. भविष्यात कोरोनाचा प्रादुर्भाव व सभासदांचे वय व सुरक्षितता लक्षात घेवुन संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करून तसे आपणांस लेखी कळविण्यात येईल.

कळावे,

**आपला विश्वासू,**

ANEKANT EDUCATION SOCIETY, BARAMATI ESTD 1961

अ. ह. शहा

**(अरहतदास हिराचंद शहा)**
अध्यक्ष
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,
बारामती

जा.क्र. अएसो–३२७ दिनांक : ११/०१/२०२१

**स्पीड/रजिस्टर्ड ए.डी. पोस्टाने रवाना**

प्रति,
**मा.सभासद,**
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,
बारामती, जि.पुणे

यांसी.....

**स.न.वि.वि.**

आपणांस कळवण्यात येते की, रविवार दि. २४/०१/२०२१ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० पर्यंतचा अनेकान्त एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या नियामक मंडळाच्या निवडणुकीचा कार्यक्रम (नवीन मंजूर घटनेप्रमाणे) दिनांक ०१/०१/२०२१ रोजी माझे सहीने जाहीर करण्यात आला होता.

परंतु कोरोनाचा प्रादुर्भाव, बहुसंख्य सभासदांचे वय व सुरक्षितता या कारणास्तव संस्थेने केलेली मागणी विचारात घेवुन नियोजित दि. २४/०१/२०२१ रोजीचा जाहीर निवडणुक कार्यक्रम मी माझे अधिकारात पुढे ढकललेला आहे. याबाबत संस्थेचे मा. अध्यक्ष यांना लेखी कळविण्यात आले असुन भविष्यात योग्य वेळी पुढील निवडणुक कार्यक्रम जाहीर करण्यात येईल.

( श्री. एस. जे. साठे )
निवडणुक अधिकारी

---

टीप : दिनांक २४/०१/२०२१ रोजीचा निवडणुक कार्यक्रम ~~रद्द~~ (पुढे ढकलल्याबाबत) झाल्याबाबत संस्थेचे वेबसाईट (www.anekantbaramati.org) या संकेत स्थळावर उपलब्ध राहील.